Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# असे व्हावे अमर!

5 Aug 2011, 0441 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला मरण टळलेले नाही. जो या जगात आला त्याला एक ना एक दिवस या जगाचा निरोप घ्यायचा आहेच. म्हणूनच बहुदा अनादि अनंत काळापासून माणसाला अमर व्हायच्या कल्पनेने झपाटलेले आहे. देहरूपाने अमर होणे शक्य नाही, मग निदान आपली कीर्ती मागे राहावी. आपले नाव मागे राहावे या कल्पनेचा पाठपुरावा अनेकजण करताना दिसतात. स्वत:चे नाव देण्याच्या अटीवरच वेगवेगळया संस्थांना देणग्या देणारे तथाकथित दानशूर पाहिल्यावर समर्थांचे वचन आठवते. समर्थ रामदास म्हणतात...

भूमंडळी विख्यात व्हावे! कीर्तीरुपी उरावे।

ऐसी कीतीर् करून जावे। निस्पृहपणे विख्यात व्हावे।।

या जगात प्रसिद्ध व्हावे, मरावे परी कीर्तीरुपी उरावे ही इच्छा बाळगण्यात चूक काहीच नाही. परंतु ही कीतीर् कशी मिळवावी? तर निस्पृहपणे. तुमच्या सत्कार्याला वैयक्तिक फायद्याचा, स्वार्थाचा हेतू चिकटतो तेव्हा त्या सत्कार्याचे मोल शून्य होऊन जाते. कीर्ती आणि प्रसिद्धीचं उद्दिष्ट समोर ठेवून तुम्ही कितीही मोठा दानधर्म केलात, देणग्या दिल्यात तरी त्यातून मिळणारी कीर्ती अक्षय टिकणारी नसते. तुम्ही केलेल्या असाधारण कार्यातून, तुमच्या श्रेष्ठ कृतीतून तुम्हाला जी कीर्ती मिळते तरी खरी असते. कारण इथे तुमचे नाव एखाद्या कामाशी, प्रकल्पाशी जोडलेले असते. तुमच्या कामातून अनेकांना आधार मिळालेला असतो. अनेकांचे आयुष्य बदललेले असते. त्यामुळे आपोआपच तुम्ही अनेकांच्या स्मरणांत अमर होऊन जाता.

मी शिकत असतानाच नोकरी न करता स्वत:चा व्यवसाय करायचे जसे ठरवले होते त्याचप्रमाणे स्वत:च्या उत्पन्नातून समाजातील गरजूंना जमेल तितकी मदत करायचेही ठरवले होते. समाजकार्याची ही प्रेरणा मला माझ्या आई-वडिलांकडून मिळाली. आमच्या तेव्हाच्या दीड खणाच्या खोलीतही एखादा गरजू विद्यार्थीर्, कॅन्सरचा एखादा पेशंट मुक्कामाला असायचा. यातूनच प्रेरणा घेऊन मी निरगुडकर फाऊंडेशन सुरू केले. पुढे फुलगावच्या धोत्रे विद्यालयाशी संबंध आला, या दीडशे वर्षांच्या शाळेला सरकारी परवानगी मिळवून देण्याची कामगिरी माझ्या हातून पूर्ण झाली. या शाळेची गरज ओळखून शाळेला लायब्ररी, प्रयोगशाळा सुधारण्यासाठी मदत करण्यापासून ते नवीन वर्गांसाठी खोल्या बांधण्यापर्यंत अनेक प्रकारची मदत आमच्या फाऊंडेशनतर्फे करता आली. उद्धव हरी धोत्रे यांनी दीडशे वर्षांपूर्वी सुरू केलेल्या आणि त्यांच्या वंशजांनी तितक्याच निष्ठेने सुरू ठेवलेल्या शाळेला "माझे नाव द्या' असं म्हणण्याचा मला काही अधिकार नाही हे मी जाणतो. पण निरगुडकर फाऊंडेशनच्या माध्यमातून ज्या हजारो रुग्णांना, विद्यार्थ्यांना आम्ही मदत करू शकलो त्यांच्या मनात आमचं नाव नेहमीच जपलं जाईल याची आम्हाला खात्री आहे.

तेव्हा कीर्ती मिळवायची असेल तर ती सत्कार्यातून, निस्पृहपणे मिळवावी, अशी कीतीर्च तुमच्या नावाला खरी शोभा आणते. आपण असे अमर होऊ शकतो.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768